# दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१६६/२०२२ मधील निशाणी १ खालील आदेश
CNR NO.MHAK070014122022
(दिनांक ०३.०२.२०२३)

**१. रोशन ईश्वरदास पोहरे,**

**२. अश्विनी ईश्वरदास पोहरे,** **-----अर्जदार**

**- विरुध्द -**

**कोणीही नाही.** **-----गैरअर्जदार**

**१.** अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन VIII, १८२७ प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

**२.** अर्जदारांच्या अभिकथनाप्रमाणे अर्जदार क्र.१ व २ यांची आई **मालुताई ईश्वरदास पोहरे** यांचे दिनांक ०२.०९.२०२२ रोजी निधन झाले. तसेच मयताचे पती व अर्जदारांचे वडील ईश्वरदास हिम्मतराव पोहरे हे दिनांक ०९.१०.१९९७ रोजी मयत झाले. मयताचे वडील केशवराव भाकरे दिनांक १६.१०.१९९८ रोजी मयत झालेले आहेत. तसेच मयाताची आई सुमित्रा केशव भाकरे ह्या दिनांक ०७.०३.२०२० रोजी मयत झाल्या आहेत. अर्जदार हे मयतांचे अपत्ये आहेत. त्यामुळे मयत मालुताई ईश्वरदास पोहरे यांना त्यांच्या मृत्युनंतर अर्जदार क्र.१ व २ यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

**३.** मयत मालुताई ईश्वरदास पोहरे यांच्या मृत्युनंतर अर्जदार यांना शासकिय व निमशासकिय कामासाठी वारस दाखल्याची अत्यंत आवश्यकता आहे व त्यामुळे त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

**४.** अर्ज व अर्जासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदार तर्फे विधीज्ञ श्री. **ए. जी. अवातिरक** यांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तूत अर्जाचे निर्गतीकरीता खालीलप्रमाणे मुद्दा उपस्थित झाल्यामुळे त्यांच्या कारणामीमांसेसह त्याचे उत्तर खालीलप्रमाणे नमुद करत आहे.

| अनु. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| **१.** | अर्जदार क्रमांक १ व २ हे मागणी केल्याप्रमाणे वारस दाखला मिळणेस पात्र आहेत का ? | **होकारार्थी.** |
| **२.** | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ व २ बाबत –**

**५.** अर्जदार यांनी आपल्या अर्जातील कथनांना पुष्टी देण्यासाठी खालील कागदपत्रे दाखल केलेले आहेत.

| अ. क्र. | कागद | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| ०१ | मयत मालुताई ईश्वरदास पोहरे यांच्या मृत्यु दाखल्याची प्रत | **नि.क्र.१०** |
| ०२ | मयत मालुताई ईश्वरदास पोहरे यांच्या आधार कार्डाची व्हेरीफाईड प्रत | **नि.क्र.११** |
| ०३ | अर्जदार क्रमांक २ च्या आधारकार्डाची व्हेरीफाईड प्रत | **नि.क्र.१२** |
| ०४ | अर्जदार क्रमांक १ च्या आधारकार्डाची व्हेरीफाईड प्रत | **नि.क्र.१३** |
| ०५ | मयत ईश्वरदास हिम्मतराव पोहरे यांच्या मृत्यु दाखल्याची प्रत | **नि.क्र.२१** |

**६.** अर्जदारांच्या मागणीप्रमाणे दिनांक १२ जानेवारी, २०२३ रोजी दैनिक "अकोला दर्शन" या आवृत्ती मधील जाहिर नोटीस **(नि.क्र.९)** काढण्यात आली. या न्यायालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत आलेला जाहिरनामा **(नि.क्र.१४)** येथे दाखल आहे. या जाहिरनाम्याच्या व जाहिर नोटीसीच्या प्रसिध्दीनंतर देखील अर्जदार हे मयत मालुताई ईश्वरदास पोहरे यांचे वारस नाहीत अशी तक्रार कुणीही आजतागायत उपस्थित केलेली नाही.

**७.** अर्जदार क्र.१ यांनी याकामी आपले सरतपासाचे प्रतिज्ञापत्र **(नि.क्र.१५)** दाखल केलेले आहे. सरतपासाचे प्रतिज्ञापत्रातील मजकूर हा अर्जातील कथने व दाखल कागदपत्रे यांचेशी पूर्णपणे सुसंगत आहे. थोडक्यात, अर्जदार यांच्या या अर्जातील कथनांना कोणीही आव्हानीत केलेले नाही. अर्जदार हे मयत मालुताई ईश्वरदास पोहरे यांच्या कायदेशिर वारस असल्याची बाब वादातीत नाही. अर्जदार क्रमांक १ व २ हे

अपत्ये या नात्याने मालुताई ईश्वरदास पोहरे यांचे हिंदु वारसा कायदा १९५६ च्या तरतुदीप्रमाणे वर्ग–१ (Class–I Heirs) ठरतात. अशाप्रकारे अर्जदार क्रमांक १ व २ हे मयत मालुताई ईश्वरदास पोहरे यांचे कायदेशीर वारस असल्याची बाब सकृतदर्शनी स्पष्ट होते. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.२ चे उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार क्र. १ व २ हे मयत **मालुताई ईश्वरदास पोहरे** यांचे वारस आहेत असा वारस दाखला (Heirship Certificate) अर्जदारांना त्यांनी योग्य ते न्यायालयीन शुल्क भरल्यावर प्रदान करणेत यावा.

३. अर्जदारांनी सिव्हील मॅन्युअलचे परिच्छेद ३१२ च्या तरतुदीप्रमाणे मयत मालुताई ईश्वरदास पोहरे यांचे नावावरील सर्व मालमत्तांची यादी दाखल करावी.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषीत)

VISHNU DATTARAO GITE

Digitally signed by VISHNU DATTARAO GITE
Date: 2023.02.03 17:54:22 +0530

**दिनांक– ०३.०२.२०२३**

**(विष्णु द. गिते)**
**सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर,**
**बाळापूर.**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same words as per original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Court Name | : | Jt. C.J.J.D., Balapur |
| Name of Stenographer | : | Shri. Shaikh Rafique |
| Date of Judgment | : | 03/02/2023. |
| Judgment Signed by P.O. on | : | 03/02/2023. |
| Judgment uploaded on | : | 03/02/2023. |